# शब्द पाखरं

(मनावरील कवितासंग्रह - भाग २)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**शब्द पाखरं** (मनावरील कवितासंग्रह - भाग २)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-995372-4-8

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

'शब्द पाखरं' हा शीर्षक माझ्या मनात अगदी सहज आलेला नाही. तो माझ्या अनेक वर्षांच्या अनुभवातून जन्माला आला. मनाच्या गाभाऱ्यात इतके विचार असतात की ते कधीच पूर्ण स्थिर राहत नाहीत. ते पंख फडफडवतात, उडायला धडपडतात, आणि कधीकधी इतके थकतात की शांत बसतात. मला जाणवले की माझे शब्दही असेच आहेत. कधी आकाशात झेपावणारे, कधी स्वतःच्याच सावल्यांत हरवलेले, कधी एखाद्या खिडकीत बसून जग पाहणारे, तर कधी कुणाच्या हृदयात कायमचे घर करणारे. म्हणूनच मी त्यांना 'पाखरं' म्हटलं.

हा संग्रह लिहिताना मला हे वारंवार जाणवलं की मानवाच्या मनासारखं दुसरं कोणतंही विश्व इतकं समृद्ध नाही. मनात प्रेम आहे, वेदना आहे, बंड आहे, शांतता आहे, तुटलेपण आहे, उभारी आहे, आणि सर्वात महत्त्वाचं अपार पावित्र्य आहे. मन हे असंख्य भावनांचं आकाश आहे. त्या आकाशात माझ्या शब्दांना पंख फुटले आणि मी त्यांना उडू दिलं. त्यांची उडण्याची दिशा मी ठरवली नाही; ते स्वतःच वारा निवडत होते, स्वतःच ऊन-सावल्या पार करत होते.

या कविता लिहिताना अनेकदा मी माझ्या भावनांना पूर्णपणे मोकळं सोडलं. कधी काही शब्द माझ्यावर कोसळले, कधी मला उचलून दूर घेऊन गेले, तर कधी माझ्या शांततेत बसून राहिले. मी शब्दांना कधीही रोखलं नाही. कारण मला नेहमी वाटतं जे शब्द मनाला स्पर्श करतात तेच खरं जगतात. या कवितेतील प्रत्येक शब्द माझ्या अनुभवांतून आला आहे. कधी आनंदाच्या ओलाव्यातून, कधी वेदनेच्या थरथरीतून, कधी एकटेपणाच्या कोरड्या हवेतून, तर कधी प्रेमाच्या सुगंधित पहाटेतून.

या संग्रहाचं मनोगत म्हणजे माझ्या शब्दांचं घर आहे. मी त्यांना पाखरं म्हटलं, पण ते माझ्यापासून उडून जाऊ नयेत, म्हणून मी त्यांना कवितांच्या स्वरूपात आश्रय दिला. शब्दांना बांधणं मला कधी कधी कठीण वाटलं. कारण

पाखरं आणि शब्द दोन्हीच स्वातंत्र्याची भाषा बोलतात. पण जेव्हा शब्द मनातून निघाले, तेव्हा त्यांच्या उडण्यावर माझा अधिकार राहिला नाही. ते कुठे जाऊन बसतील, कोणाला स्पर्श करतील, कोणाचं आयुष्य बदलतील. ही शक्ती आता शब्दांचीच आहे.

हा संग्रह वाचताना कोणालातरी त्याच्या स्वतःच्या मनातील पाखरं पुन्हा ऐकू येतील. ही माझी मोठी अपेक्षा आहे. मन अनेकदा बोलतं, पण आपण ऐकत नाही. या कवितांनी थोडा का होईना, तुम्हाला स्वतःकडे नोवं, स्वतःला हात द्यावं, स्वतःला समजून घ्यावं हीच इच्छा.

शब्द उडत राहोत. पंख थकत राहोत. भावना प्रवाहित होत राहोत. आणि मन, त्याच्या असंख्य आकाशांसह, सतत नवं होत राहो.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

काव्याच्या विश्वात एक अद्भुत जादू आहे. शब्दांना उडणे देता येते. शब्द जमिनीवरचे नसतात; ते माणसाच्या मनातून उगवतात आणि आकाशाकडे झेपावतात. शब्द पाखरं हा काव्यसंग्रह म्हणजे अशाच असंख्य भावनांच्या पंखांना दिलेली हलकी, मुक्त, निर्मळ झेप. या कवितांचा आशय मनावरील अनुभव, अंतर्मनातील हालचाली, हृदयाच्या अंधार–प्रकाशांतील धडधड, भावनांच्या ऊर्मी आणि मनाच्या गुंतागुंतींच्या प्रवाहाशी घट्ट जोडलेला आहे. पण त्यांना शब्दरूपात जमिनीवर बांधण्याऐवजी कवीने त्यांना पंख दिले आहेत. म्हणूनच या कविता आकाशाला भिडतात, तर कधी एका अलगद वाऱ्यासारख्या मनात उतरतात.

मन हे माणसाचे सर्वात गुंतागुंतीचे, आणि तरीही सर्वात सहज भासणारे आयाम आहे. त्याच्या गाभाऱ्यात कितीतरी भावना दडलेल्या असतात. काही अनामिक, काही अतिपरिचित, काही वेदनारूप, काही उजळ, काही विस्कटलेले, काही पुन्हा पुन्हा तयार होणारे. शब्द पाखरं या संग्रहातील कविता मनाच्या या असंख्य छटांचा नाजूक शोध घेतात. जणू प्रत्येक कविता मनाच्या एका झाडावर बसलेलं एकच पाखरू आहे. कधी गाणारं, कधी थरथरणारं, कधी शांत, तर कधी दूर क्षितिजाकडे पाहणाऱ्या डोळ्यांनी स्वप्नाळू.

या संग्रहातील सर्वात सुंदर वैशिष्ट्य म्हणजे येथील प्रत्येक शब्दाला जिवंतपणा आहे. शब्द फक्त अर्थ वाहत नाहीत; ते भावना बाळगतात. ते उडतात, थव्यात राहतात, परत येतात, घरटे बांधतात, तुटतात, पुन्हा बांधतात. हे शब्द पाखरं कवीच्या मनात जन्मतात, त्याला वेदना देतात, आनंद देतात, आणि मग उडून वाचकाच्या मनात जाऊन नवीन घरटी बांधतात. एवढ्या आत्मीयतेने शब्दांना पाहणारे साहित्य अतिशय दुर्मिळ आहे.

कवीचे मन जितके संवेदनशील, तितके शब्द अधिक पंख लावतात. येथे शब्द तुटके नाहीत; ते हलके आणि निर्भय आहेत. ते अडथळे ओलांडतात, मनातील दडपण तोडतात, आणि भावनांच्या पलीकडे जाऊन माणसाच्या

अस्तित्वाशी संवाद साधतात. कोणत्याही काव्यसंग्रहात अंतर्मनाचे चित्रण करणे अवघड असते, पण या संग्रहात ते केवळ झालेच नाही; ते वाचकालाही जाणवते, स्पर्शते आणि त्याच्या आयुष्याशी एकरूप होते.

'मन' हा या संग्रहाचा केंद्रबिंदू आहे, पण ते मन केवळ व्यक्तिचं नाही. ते सर्वांचं आहे. प्रत्येकाला आपलं मन परिचित असूनही कधीच पूर्णपणे समजत नाही. कधीकधी आपणच स्वतःला ओळखत नाही. त्या चंचल मनाला पंख देऊन, त्याला उडायला, फिरायला, शोधायला, परत यायला शिकवणारा हा संग्रह आहे. ही कविता सतत सांगते मन पाखरासारखं आहे: धरून ठेवायचं नाही, थांबवायचं नाही, फक्त त्याला उडू द्यायचं. या संग्रहातील भाषा अत्यंत स्वच्छ, नीटस आणि भावनांच्या धाग्यांनी विणलेली आहे. शब्दांमध्ये उगाच भावनांचे ओझे नाही; उलट ते नाजूक, कोवळे आणि प्रसन्न आहेत. काही कविता वेदनेतूनही आशेची झुळूक देतात, तर काही आनंदातही अंतर्मुख करतात. कवीने मनाच्या प्रवाहाला शब्दांद्वारे जसं पकडलं आहे, तसं पकडणं अनुभवी साहित्यिकांकडूनही फार क्वचित पाहायला मिळतं. या कवितांतील प्रतिमा अत्यंत सुंदर आणि सूक्ष्म आहेत. पंख, आकाश, वारा, प्रकाश, धूसरता, झाडाची फांदी, ओसाड आकाश, एखादं जुनं घर, रिकाम्या खोल्या, श्वासाचा थरथर सर्व प्रतिमा मनाच्या हालचालींचं प्रतिनिधित्व करतात. प्रत्येक कवितेत एक नाजूक कंपन आहे. जसं पाखराच्या पंखांचा मंद आवाज. काव्यसंग्रह वाचताना अनेक ठिकाणी असे वाटते कवी स्वतःला नव्हे, तर वाचकाला वाचतो आहे. एखाद्या मनाच्या अंधाऱ्या खोलीत ठेवलेले विसरलेले दिवे तो हळूच पेटवत आहे. काही कविता मनाला समजावतात, काही रडू देतात, काही विसरलेलं पुनः दृढ करतात, काही एकटेपणाला शब्द देतात, तर काही प्रेमाच्या अतिशय शांत छायेवर प्रकाश टाकतात. या विविधतेमुळे आणि या सूक्ष्म भावछटांमुळे शब्द पाखरं हा संग्रह अत्यंत संपन्न, सघन आणि मनाजवळचा ठरतो.

हा संग्रह ज्येष्ठ लेखकाच्या दृष्टीने पाहिला, तर त्यात एक मोठी जाण आहे. कवी शब्द हाताळत नाही; ते शब्द त्याला हाताळतात. आणि म्हणूनच हे शब्द उडतात. जे शब्द पंख लावून उडतात तेच वाचकाच्या मनात कायमचे जिवंत राहतात. अशाच शब्दांनी हा संग्रह बांधला आहे.

**श्री. निलेश दातीर**
मुबई

# अनुक्रमणिका


१) कशाला अशी तू ... ११
२) अनुनय भावविभोर ... १२
३) अंग श्रीरंगाचे व्हावे ... १३
४) स्वप्नांची फुलपाखरे येती... १४
५) मातीतून विलसावी ... १५
६) सुखाचा किनारा ... १६
७) सुगंध दरवळ श्वासाचा ... १७
८) हीच दे देवा सखी साजणी ... १८
९) युगात तू तू क्षणामधे ... १९
१०) स्मृती राजसाच्या ... २०
११) पडदे गुणी रहावे ... २१
१२) एक दवाचे झाड ... २२
१३) गुलाब उपवन गुलाबी मळे ... २३
१४) बरस बरस हे बरस नभा ... २४
१५) जीव पावसातून गोळा ... २५
१६) प्रिया मनाचा पिसारा ... २६
१७) कृतज्ञ चरणी राहू ... २७
१८) फुलास प्रीती देती ... २८
१९) आई म्हणजे तत्त्व चिरंतन... २९
२०) पाऊस गुडूप व्हावा ... ३०
२१) शब्देविण सांगितले ... ३१
२२) मधुर मधुरतम माधुर्याची ... ३२
२३) बगळ्या बगळ्या कवडी दे ... ३३
२४) थांब जरा तू राजा वरुणा ... ३४
२५) हृदय वाहिले आहे ... ३५
२६) भीज पावसाची ... ३६
२७) मनातला मोरपीस ... ३७
२८) काळजाचे पिकलेत ओलसर गरे ... ३८
२९) बकुळफुलांनो जाणून घ्यावे ... ३९
३०) पाऊस वेडा वागे ... ४०
३१) दडून बसल्या माशीलाही ... ४१
३२) एक गुलाब जो ... ४२
३३) जरा वळून पहावे ... ४३
३४) देव भेटता जन्म सार्थकी ... ४४
३५) मोरपीस ... ४५
३६) कविता अळवासारखी ... ४६
३७) अत्तर फाया मनी राहणे ... ४७
३८) पुनव मनात विराळी ... ४८
३९) चिंब ओल्या वाटेवरती ... ४९
४०) मोहनाचे वेड ते ... ५०
४१) कृष्णमय हो राधिका ... ५१
४२) श्रीहरी रे श्रीहरी ... ५२
४३) स्मरता कमला वा उमाकांत ... ५३
४४) भरलेल्या मेघांची तोरणे ... ५४
४५) गुणपती गणपती ... ५५
४६) महालक्ष्मी माऊली ... ५६
४७) एक मन हरवून जाता ... ५८
४८) भाळणे भाव पाळणे ... ५९
४९) ना बोचतील काटे ... ६०
५०) तू जपून टाक पाऊल सजनी ... ६१

५१) दिवाळीच्या आठवणी ... ६२

५२) तू प्रिये जगणे नवे ... ६३

५३) दे सख्या मज प्रीत भावन... ६४

५४) भाग्यवती मज हातीची ... ६५

५५) छंद कमळ जडू
दे न जीवा ... ६६

५६) आजही जेंव्हा
पाहतो सुरंगी ... ६७

५७) वाटे मला कितीदा ... ६८

५८) गाव तोच रेखावा ... ६९

५९) काट्यातल्या गुलाबा रे ... ७०

६०) ऐक बा विठ्ठला ... ७१

६१) हातातल्या गुलाबाने ... ७२

६२) लावण्ये घडविले ... ७३

६३) झाडा तुझ्या फांदीवर ... ७४

६४) जगणे असेच चाले ... ७५

६५) इवली चिमणी
राहते मनी ... ७६

६६) अशी पहावी
जरा बकुळी ... ७७



## (१)
## कशाला अशी तू

कशाला अशी तू
नजर टाकते ना
तुझ्या रूपगोडीने
मन माखते ना


मुखश्री तुझी मजसी
का मोहवी ती
तू म्हणजे सुखाची
कल्पना मज हवी ती

केसात तू  माळली जी
फुले ती
सुखावून हृदयकलिका ही
खुले की

तुझ्या ओष्ठरागात
अनुराग झळके
तुझ्या बंद जिवनीत
होकार फळके

कधीही ना संपेल
गारूड तुझे गे
मला उधळवीते
मन वारूड तुझे हे

दि.१७/०६/२०२४
सकाळी ०६.२९ वा.



## (२)
## अनुनय भावविभोर

भरून आल्या आभाळाच्या
मनात दडले काय
कुठे ती लपते दुधात साऱ्या
मधुर मधुरशी साय

लपवून जगतापासून कितीशी
गुपिते उरात खोल
कसे कोणते येतील ऋतू जे
करतील हृदया मोल

सरकून उरकून फिरकून जाती
क्षण कितीसे अगणित
कुणी कुणाचे गतजन्मीचे
होत जाय संचित

बांध टाकल्या काळजातल्या
नदीस भरते पूर
जवळ वाटतो गाव प्रियाचा
होता आजवर दूर

कोसळतील त्या धारा आपसुक
वर्षा हर्षाची
कळतील गीते सुरात नटली
अनुपम स्पर्शाची

ती प्रीती हो अनुप्रीती मग
अनुनय भावविभोर
किती जन्माची वाट पाहतो
चांदणीसाठी चकोर

दि.२१/०६/२०२४
सकाळी ०६.०७ वा.



**(३)**
**अंग श्रीरंगाचे व्हावे**

गुलाबाच्या पाकळीला
गंध गुलाबीच आला
रंग सुगंध आकार
कोणी ठरवून दिला

कोंब कळीचा डोकवे
फांदीवर पानातून
झाड हळूच सुखावे
त्याच्यामुळे की आतून

कळी कळीदार होते
रेशमाचे अंग ल्येत
आवरणा भेदताना
रूप नवे नवे घेत

आत बांधली पाकळी
उमलते अशी काही
तिच्या मनातील सारे
जणु फुलातुन पाही

आता हासऱ्या फुलाला
कोणी छंद मोहवावे
नाविन्याची प्रीत लाभे
अंग श्रीरंगाचे व्हावे

दि.२३/०६/२०२४
सकाळी ०७.२३ वा.




## (४)
## स्वप्नांची फुलपाखरे येती

कुठली पुण्ये कशी फळावी
ओंजळीत सुख येताना
नकळत घडते काही ऐसे
कवेत चांदणे घेताना

आकाशातील चंद्र तारका
लुकलूकताना हसतात
फुले सानुली आपसूक हळवी
गंधकोशी मग बसतात

स्वप्नांची फुलपाखरे येती
भावमधुलिका भरण्याला
पहाटवेळी गुंजन खेळी
मनी मोहना स्मरण्याला

आकाशाचे रंग हजारो
पसरून जाती अवकाशी
आणि निशेला जाग रोजची
नक्षत्रांच्या बाहुशी

श्वास मोकळे भरता येतील
दिशा खुल्या दश स्फुरताना
कधी कुणाच्या आठवातुनी
जन्मोजन्मी उरताना

दि.२५/०६/२०२४
सकाळी ०७.५८ वा.



## (५)
## मातीतून विलसावी

स्पर्श वल्लरी भाव सुंदरी
कलिका मनोहारी
पुष्प उमलण्या आधी प्रकटे
निर्मिती ही न्यारी

हृदयमंजिरी पराग कणेरी
जन्म जिथे लपला
सुगंध कोठे इथे तिथे ना
अंगांगी छपला

एकावरती एक परती बघ
कोमलता लपटे
हळव्या सुकोमल भावरचनेचे
पांग असे ते फिटे

रंग कोणते अंग कोणते
संग कोण आहे
श्रीरंगाच्या अंतःकरणी
दंग कोण पाहे

कलिका आजची नांदी फुलाची
मुकुलिता हसावी
देठापासून सुरभी कोश घे
मातीतून विलसावी

दि.२६/०६/२०२४
सकाळी ०७.५५ वा.



## (६)
## सुखाचा किनारा

तुझा हात हाती
चांदण्यात राती
वाट ही नशीली
जळी चांद वाती

इथे पेटलेल्या
विरहास शमवी
तुझे रूप चंद्रम्याच्या
तेजास नमवी

हरित भान स्वप्नील
मनी हुळहुळे जे
स्पर्शातुनी नवखे
प्रेम का खुले हे

प्रिये सांग कोणास
लाभे हा सहारा
जवळी असता तू गे
सुखाचा किनारा

नको शब्द केवळ
भाव हे पुरावे
चांदव्यानेही नको ग
अंबरी झुरावे

मिळो ज्याचे त्याला
मनाचे निवारे
फिरो मानसी वर
सुगंधी फवारे

दि.२७/०६/२०२४
रात्री ०७.३५ वा.



## (७)
## सुगंध दरवळ श्वासाचा

जलधारांच्या अमृतथेंबातुन
ओघळून ये राणी
स्पर्श गारवे मना हवे जे
कोमलांगी तू दे राणी

आज मला जे पुन्हा खुणावे
मीलन मधुतम होताना
गतजन्मीच्या पुण्याईने
फळास ऐसे येताना

शब्द तुझा जो माधुर्याचा
मधुकण भरती तुझ्या मनी
भाव गोडवा झळकत राही
नजरेतून तव प्रीतकणी

का लज्जेचा पडदा धरीशी
अंग चोरीशी मिठीतुनी
मिटल्या लोचनी स्वप्न रंगविशी
धीर धरावा किती कुणी

ओलेत्या अंगास शहारा
सुगंध दरवळ श्वासाचा
देती पापण्या खडा पहारा
सत्य क्षण की भासाचा

बरस बरसू दे वर्षावातून
मेघ दाटल्या हृदयासी
बाहुंमध्ये ऋतू सांभाळीन
अधरामृत दे सदयासी

दि.२८/०६/२०२४
सकाळी ०७.३४ वा.



## (८)
## हीच दे देवा सखी साजणी

कलत्या उन्हात गडे साजणी
तुझा आधार मज लाभू दे
चढत्या काळी साथ दिली तू
गंध मायेचा वाढू दे


थरथरणाऱ्या हातालाही
कंप का सुटतो कळंच ना
निर्बल झाला तुझा ग साथी
आता त्याला काही वळंच ना

वळवून घेतीयास आज बी मला
शब्द तुझा ना कधी दुखरा
क्षणाक्षणाला घट्ट नाते तू
केले म्हणूनच म्या ना उपरा

उभा म्हणूनच आहे सांगतो
पाहून सोबती कारभारणी
धडकत राहतं काळीज येडं
वाटतंय जगणं सत्कारणी

तू मागितलं साता जल्माचं
आपलं नातं देवासनी
म्या बी मागतो जल्मोजल्मी
हीच दे देवा सखी साजणी

दि.२९/०६/२०२४
सकाळी ०७.४४ वा.



## (९)
## युगात तू तू क्षणामधे

किती तुझी मी वाट पाहते
श्याम मोहना मनभावना
छळशील किती रे ये सामोरी
लपून छपून ना छेड मना

तुझ्या वेणूचे रंग सात हे
सूर सातही ऐकावे
तुझा हात मज हाती असावा
वृंदावनी राधा ठावे

वैजयंतीची माळ गळ्यातील
मुकुटातील मयूराचे पिस
मना लागला नाद सावळा
कळे सांज उलटली ये दिस

आजही तिथल्या झाडाखाली
देख कन्हैय्या राधेला
यमुनेच्या त्या तीरावरती
सांज रेंगाळे काठेला

आता कोणते सूर तू छेडून
देशी मोहना मनामधे
तूच मनी तू देहकणी
युगात तू तू क्षणामधे

दि.०१/०७/२०२४
सकाळी ०६.१६ वा.



## (१०)
## स्मृती राजसाच्या

वळून पाहते मी
तुला वळणावरती
ती वाट आता
पुन्हा एकटी रे

जिथुन दूर गेलास
तेथेच मीही
उगा मूक राहे
सवे सांज तीही

का शब्द माझे
जणू गोठलेले
का बंद ओठी
निरोप साठलेले

न कळती दिशा
मजसी वेडावतात
जिथे पाहू तेथे तू
स्वर धावतात

स्मृती राजसाच्या
कशा रे मिटाव्या
हृदय मंदिरी त्या
पुन्हा उमटाव्या

दि.०३/०७/२०२४
सकाळी ०८.४९ वा.



## (११)
## पडदे गुणी रहावे

किती गुड्यांचे पडदे मनाशी
किती रंग झुळझुळे
एक उडे तो दुसरा ओढे
वाऱ्याशी सुळसुळे

बदलत राहती पडद्यामधले
चित्र सदा का असे
आता भासते हे माझे अन
क्षणात परके कसे

लावून घ्यावे हौस हौशीने
पुन्हा पुन्हा पडद्यांना
का सारावे दूर दूर ते
कडेस बघ भिंतींना

उघडून द्याव्या खिडक्या साऱ्या
पडद्यातून झाकल्या
झुळुका हवेच्या श्वासासंगे
ताज्या ताज्या कळ्या

सहज उघडता यावे पडदे
सहज सारता यावे
भावभावनांच्या ह्या कोंदणी
पडदे गुणी रहावे

दि.०६/०७/२०२४
सायं. ०६.०४ वा.




## (१२)
## एक दवाचे झाड

अंगणी माझ्या उमलून आले
एक दवाचे झाड
गार गारवे मोती हसती
मिश्किल थोडे द्वाड

कुणी सान तर कुणी टपोरे
अमृत जल बिंदु
हाती येतील खेळवता मग
समाधान सिंधु

नजरेमध्ये घर करतील ते
स्वप्न साकारताना
रूप जळाचे किती गोडुले
दवास आकारताना

कधी वाटते इवले इवले
रत्न दवाचे झाले
तेज चकाकी अंगोपांगी
मन हे हरखून गेले

हाती यावी दवबिंदूंची
माळ अशी देखणी
किती गोडवा निसर्गात हा
करू त्याची राखणी

दि.०५/०७/२०२४
रात्री ११.३४ वा.



## (१३)
## गुलाब उपवन गुलाबी मळे

गुलाब उपवन गुलाबी मळे
गुलाब फुलले हासत सगळे
चंद्र गुलाबी चांदणेही ते
गुलाबीच भवतालचे खळे

गुलाब रांगांमध्ये गुलाबी
हवा गुलाबी वाहत राही
गुलाबदल ते उमलून येता
गुलाब खुलले गुलशन काही

गंध गुलाबी अत्तरदानी
स्पर्श गुलाबी मंतरलेले
गुलाब येथे गुलाब तेथे
भाग्य गुलाबी अंथरलेले

काट्यांवरती डुलती गुलाब
दुःख सोस बोलती गुलाब
सुख जे हवे ते मिळे कधी
मातीत रुतून घे वदे गुलाब

मनास येई रंग गुलाबी
क्षणाक्षणाला संग गुलाबी
राधा मोहन छंद गुलाबी
प्रेम बहर स्वच्छंद गुलाबी

दि.०७/०७/२०२४
रात्री ०७.१९ वा.



**(१४)**

**बरस बरस हे बरस नभा**

बरस बरस हे बरस नभा
आषाढाचा मास उभा
आस आगळी धरतीला
भिजव प्रेमाने भुईगाभा


सळसळत्या झाडांवर बैस
पानोपानी दवास पैस
कळ्या फुलांच्या खळ्या होऊनी
हास पावसा तू ऐसपैस

तुझ्या प्रेमाचा गंध हुंगु दे
अन मातीचा सुगंध घे
गगन धरेच्या मीलनास या
मल्हाराचे तू छंद दे

सूर ओलिते ओल्या ओळी
ओले नाद हे ओल्या गायळी
शहारलेल्या सृष्टीमध्ये
उमलून येईल हृदय पाकळी

झरझर झरझर पाऊस झरता
कुठे सखी मज मनात स्फुरता
पाऊस संपे प्रीत तजेली
खुणा माधुरी जीवनी उरता

दि.०८/०७/२०२४
सायं. ०६.४८ वा.



## (१५)
## जीव पावसातून गोळा

थेंबाच्या पडद्यामधले
गूज पावसाचे ऐकू
चिंब चिंब भिजताना जरा
निवांत सरी मध्ये टेकू


धूसर धूसर दिसेल सारे
तरीही पाणी स्पष्ट किती
स्पर्श हवासा मना दिलासा
जीवनाची संपेल भीती

एकच गाणे सुरेल त्याचे
टपटप सरसर सरीतुनी
अंगावरती थेंब पडावे
खळखळ झरणे दरीतुनी

कोठून येती पाऊस धारा
रिमझिम स्वर्गातून जशा
मरगळ फिटते आशा वाटते
चैतन्याची नवभाषा

केवळ पाऊस केवळ आपण
निव्वळ स्मृतीमय हिंदोळा
भिजल्या धारणीवरती भिजला
जीव पावसातून गोळा

दि.०९/०७/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (१६)
## प्रिया मनाचा पिसारा

सरसर धारा पाऊस गारा
अंगास ये शहारा
नाचत राही आतून फुलला
प्रिया मनाचा पिसारा


अवखळ किती प्रिया रे
ही पावसाची खोडी
तुज भेटीची तो लावे
माझ्या मनास गोडी

जळ ओघळून जाता
देते किती दिलासे
मागू कसे तुझ्याशी
गुज भेटीचे खुलासे

संपेल का दुरावा
आता न राहवे रे
जावे मिटून कोशी
ना विरह साहवे रे

म्हणतात पावसाचा
लाभे जिवा सहारा
हातात हात येता
लाभे मना किनारा

दि.१०/०७/२०२४
रात्री ०९.२५ वा.



## (१७)
## कृतज्ञ चरणी राहू

खडकालाही फुटती पाझर
पायतळी रोपटे
बीजामध्ये दडले काय ते
रंग रूप गोमटे

वर्षा होते चार मास परि
जीवन चाले निरंतर
काय व्यवस्था कोण निर्मितो
कृती त्याची अपरंपर

भूमातेच्या उदरी दडते
बीज गुप्त राहुनी
भाग्य फळावे तसे अंकुरते
कोंब ये डोकावुनी

निर्मळ जल तो देतो बरसून
कृपा त्याची ती जाणू
सतत प्रयासे त्या चरणावर
मनास नमवून आणू

चिंतन त्याचे सतत करावे
फुले उमलता पाहू
कुणा जमेल का किमया त्यासम
कृतज्ञ नेहमी राहू

ईश्वरा, कृतज्ञ चरणी राहू
तुझिया कृतज्ञ चरणी राहू

दि.१३/०७/२०२४
सकाळी ०९.३३ वा.



## (१८)
## फुलास प्रीती देती

तू दिलेला सोनचाफा की
प्रीत बोलकी वाटे
प्रियेस देशी गंध सुगंधी
रीत नव्याने दाटे

तिने मांडियली सुबक रांगोळी
प्रेम तियेचे ओतून
कुसुम मनाची असती प्रतीके
प्रेम झरे स्वर्गातून

ईश्वरी संकेतांची मीलने
वसुंधरेवर घडती
अंबर धरणी प्रीत फुलूनी
सडे फुलांचे पडती

कुणी रसिक ते येती आणिक
पुष्प वेचुनी घेती
भाव मनातील आरोपून त्या
फुलास प्रीती देती

या काळजाची त्या काळजातून
तार छेडली जाते
हळूच कोकिळगाण सुरातील
कुठूनसे ऐकू येते

दि.१४/०७/२०२४
सकाळी ०६.४१ वा.



## (१९)
## आई म्हणजे तत्त्व चिरंतन

ही मायेची छत्रछाया जी
माय शिरावर धरते
जगात सांगा कोण आईसम
स्नेह लेकरा करते

येतील कितीही विपदा भयंकर
देह शस्त्र होतो ना
तिच्या मनातील आशीर्वचनही
अस्त्र बाण होतो ना

तिच्या चिंतनी वात्सल्याची
ओढ सदा जाणवे
आणिक स्पर्शातून तिचा तो
स्वर्ग जणु मानवे

श्वासासंगे लेकरु चिंता
काळजात चालते
जन्मभरी ती निज संततीस्तव
हळूच आसू ढाळते

सुख मागावे केवळ आईने
पिलांसाठी निरंतर
पशु पक्षीण की मानव माय ती
भाव तिचे अजरामर

आई म्हणजे तत्त्व चिरंतन
ईश रूप गोडवा
आई म्हणजे जन्मांतरीचा
बंध निखळ जोडवा

दि.१५/०७/२०२४
रात्री ०९.३६ वा.



## (२०)
## **पाऊस गुडूप व्हावा**

धो धो धो धो कोसळताना
भेट कुनाची घेतो
किती युगांचा विरह साहुनी
मीलनास तू येतो

आवर आवेगास पावसा
तुडुंब भरल्या सरिता
बरसून जाशील धुंदीमध्ये
तुझ्या प्रियेच्या करिता

भरून येईल आभाळाचा
ऊर तुझा दाटला
बरसण्यातल्या आनंदाने
चरम भाव गाठला

साक्षी होऊन सृष्टी सारी
शहारली अंगाने
नवे उमलणे नवेच फुलणे
नव्या नवेल्या रंगाने

घेत विसावा देई दिलासा
किंचित विराम घ्यावा
पुन्हा प्रियेच्या बाहुंमध्ये
पाऊस गुडूप व्हावा

दि.१९/०७/२०२४
सकाळी ०८.३२ वा.



## (२१)
## शब्देविण सांगितले

बोल सख्या तू ऐकत राहीन
शब्द तुझे झेलता
किती दिसांचा अबोल होता
पारिजात बोलका

सुगंध येईल तुझ्या मनातून
प्रीत माझी दरवळता
शब्द जरी मी ना बोलले तरी
मूकभाव तुज कळता

किती सांगणे तुला जे आहे
कानी पंचप्राण
कशास घेतो पुन्हा पुन्हा मग
वदवून सारखी आण

जे जे सुंदर आणि अलौकिक
घडवून देईन आज
शब्द तुझे ते लेऊन येतील
माझ्या मनातील साज

कळेल तुजला सखी ही तुझी
अंतरातली आहे
उघड्या नयनी अथवा मिटुनी
स्वप्नं अनोखे पाहे

बघ कळते का तुला जे आहे
शब्देविण सांगितले
देईन सौख्य जे कधीही प्रिया
तू न मनी मागितले

दि.२१/०७/२०२४
रात्री ११.२२ वा.




## (२२)
## मधुर मधुरतम माधुर्याची

ओथंबून मग येणे म्हणजे
प्रपात पहावे होऊन
वर्षा होता प्रीतीभरली
मस्त घ्यावे की न्हाऊन


सोडून द्यावे झोकून थोडे
स्वतःस उंचावरुनी
खळखळ अवखळ भावप्रवाह ते
मुक्त मोकळे करुनी

रूप वेगळे स्वरूप होते
निजरूपाची गोडी
अनुरागाची सृष्टी फुलता
लाली उमटते थोडी

मधुर मधुरतम माधुर्याची
ओढ जिवा मग लागे
मन हे वेडे अजून थोडे
वेड्यासम का वागे

क्षणात विरतील ताप युगाचे
पुण्य फळाला येईल
सुखद क्षणांची रेलचेल मग
सुखासुखी बघ होईल
सखया, सुखासुखी बघ होईल

दि.२२/०७/२०२४
रात्री ११.२२ वा.



## (२३)
## बगळ्या बगळ्या कवडी दे

या बगळ्यांच्या झाडाला म्हणे
जाग नवी आली
तांबडे फुटता आकाशाला
उषा उतरली खाली

माना वळवून अंदाजांच्या
सीमा बांधल्या जातील
पंखांवरल्या कोरीवतेतून
दिशा टांगल्या जातील

सांज असो की सकाळ आता
रंग ढवळा बगळ्यांचा
त्यावर पडतील किरण सोनेरी
तरी संग ढवळा बगळ्यांचा

मुश्कील बगळे मिश्किल बगळे
सोंग ढोंग बगळ्यांचे
रंग धवल परी कृष्ण काळीजे
पोंग बोंग बगळ्यांचे

असले तापस किती चालायचे
कळेल एकदा सारे
अन बगळ्यांचे खरे रंग मग
दाखवून देईल वारे

तोवर चालो तुमची शाळा
बगळ्या बगळ्या कवडी दे
जगताना तू एक तरी मग
सच्चाईची दमडी दे

दि.२३/०७/२०२४
सकाळी ०९.१२ वा.



## (२४)
## थांब जरा तू राजा वरुणा

सरीत सर मिसळुनी ती झरते
झरझर पाऊसधारा
पिसाट होतो बेकाबू का
बेभान तुफानी वारा

मनात पाऊस भीती ओलसर
गुडूप घरातून होणे
कुठे पुराच्या धोक्यापायी
पाय माघारी घेणे

कडकड कडकड विजा चमकती
काळोखात दामिनी
रुद्र भयानक वाटून जाते
मुसळधार यामिनी

काय ठरविले आभाळाने
जलमय सृष्टी व्हावी
पाणी पाणी जिकडेतिकडे
आणीबाणी कळावी

थांब जरा तू राजा वरुणा
बरसत किती रे राहशील
जीव टांगणी नदी अंगणी
अंत कितीसा पाहशील

दि २५/०७/२०२४
सकाळी ०९.१६ वा.




## (२५)
## हृदय वाहिले आहे

किती रंगशील रंगामध्ये
राधे श्रीरंगाच्या
कथा आपुल्या होतील गाथा
अमर प्रीत संगाच्या

एक छेडिली तार सुराने
धुंद मग्न तू झाली
धावत सखये माझ्यासाठी
आतुरतेने आली

सप्तसुरांच्या सीमा आपुल्या
प्रीतरागिणीला ना
वेणु हसते अधरी बसते
राधाकृष्ण मधुलीला

चंद्र खुलावा तू मी असता
चांदण्यात रोहिणी
कशास मिटशी नयन बोलके
मंजु मधुर मोहिनी

क्षण हे सुंदर मन अपरंपर
हृदय वाहिले आहे
राधा पाहते कृष्ण उरातून
कृष्ण राधेला पाहे

दि.२५/०७/२०२४
सकाळी ११.२९ वा.



## (२६)
## भीज पावसाची

भीज पावसाची शीतल शहाऱ्याची
धुंद राहण्याची ही संगती अशी
गाभुळला ऋतू जाई उतू उतू
भावनांची हुतुतू संमती कशी

धुरव्यात धुकं काळजाचं ठोकं
बधिरलं अंग अंग दंग होत बसं
नजरेत लाज तिचा दाटलाय साज
कोपऱ्यात डोळ्याच्या अलवार हसं

छत्रीत एका, बिलगून एकमेका
तुझ्या माझ्या भावनांचा,
उंच उंच झोका
जरा जरा थांब, जाऊ दोघे लांब लांब
बरसात प्रीतधारा, मधुरसा मोका

दिनरात हवा, आशा पाखरांचा थवा
बेहोशीचा नवा, रंग सांग सख्या मला
काय तू बोलावे, काय मी सांगावे
शब्देवीण गूज माझे, कळावे की तुला

ऋतू पांघरावा, थंड तुषार फवारा
अत्तराचा फाया, उडे मातीतून सारा
टवटवी फुलवीत, आली नाचत उडत
बावरून गेली की ही वर्षाव धारा

दि.२७/०७/२०२४
सकाळी ०८.२१ वा.



## (२७)
## **मनातला मोरपीस**

मनातला मोरपीस फिरतो कसा
श्रीरंग मनी माझ्या उरतो तसा
भाव माझे प्रीतीतले अति अलवार
अनुभव घेत जाशी अति हळुवार


आठवांच्या हिंदोळ्याला उंच उंच झूल
तशी तुला पडते ना माझी सख्या भूल
हाती माझा हात येता हरखून जाशी
नदीकाठी गाव एक नव्याने पाहशी

आता हवा अलगद आल्हाद देते ना
बोल माझे मंजु वेणु प्रल्हाद देते ना
मन माझे मोरपीस फिरे काळजात
कसे कुठे जुळविले धागे या जगात

हरवले क्षण आता शोधावे तू इथे
हाक जिथे मारशील पहा मला तिथे
जन्म फिका रिकामासा जातो का वहात
क्षण एक युग देतो अंतरी रहात

बरसात तुझ्यावर भाव भरलेली
भेट होती आपली का कधी ठरलेली
आता एकरूप व्हावे जगणेच सारे
हवे तसे वहावेत नशिबाचे वारे

दि.२९/०७/२०२४
सायं. ०५.२७ वा.



## (२८)
## काळजाचे पिकलेत ओलसर गरे

डोंगराला जाग आली वाहतात झरे
काळजाचे पिकलेत ओलसर गरे

टणकशा देहावर पावसाचा शेला
मनातुन पर्वत ढगातचि गेला

आली बागडत कशी मिठीतुन राणी
पावसाची कानामध्ये त्याच्या गात गाणी

कोणी कसे फिरकेना उन्हाच्या झळात
एकटाच डोंगुर हा विराण काळात

आता सुखे अंग त्याचे मोहरून गेले
पांग फिटताना डोळे भरभरून आले

दि.२९/०७/२०२४
सकाळी ०८.३१ वा.



## (२९)
## बकुळफुलांनो जाणून घ्यावे

बकुळफुलांनो जाणून घ्यावे
हळवे माझे मन
सुगंध भरला जसा मोहवी
मोहे तन कण कण

उपवन फिरता दिसता तुम्ही
हासत उमलून आल्या
सांगा पाहू काय मनीच्या
आठव जाग्या झाल्या

कुठे कुणी तो मनात बसला
दिसला की नाही ग
म्हणून मनातून अलगद डोळे
मिटून तया पाही ग

उमलून येणे दुजियांसाठी
फुलणे तसेच असते
स्वतःसाठी कधीच आपुले
जगणे का ग नसते

कधी कुणी का घेईल समजून
आपुला तो होताना
येईल का मग काळजातची
कुठेच न जाताना

दि.०२/०८/२०२४
रात्री ११.३२ वा.



## (३०)
## पाऊस वेडा वागे

मीऽऽ तूऽऽ पाऊस छत्री
आठवले ना काही
कधीकाळचा पाऊस वेडा
अजून मनात राही

सरी ओघळल्या लाजलाजुनी
अंगावरती शहारा
तशात छेडीत खोडी काढतो
मस्त धुंदला वारा


पानोपानी राग पसरला
मल्हाराचा मधुरसा
धुक्यात हरवून जाते सकाळ ही
रस्ता रोजचा दूरसा

ओल्या ओल्या मातीमधल्या
अत्तरदाण्या खुलल्या
कुठे लाजवंतीच्या गाली
मीलन कलिका फुलल्या

येतो पाऊस गवाक्ष साक्षी
ओघळते ना वर्षा
आसुसलेले जीव भेटता
किती उत्सुकता स्पर्शा

मनात माझ्या अजूनही तो
पाऊस वेडा वागे
आठवणींनी पुन्हा नव्याने
प्रीत मनातून जागे

दि.०३/०८/२०२४
दुपारी १२.३१ वा.



(३१)

## दडून बसल्या माशीलाही

दडून बसल्या माशीलाही
गंध गुलाबी खुणावे
स्पर्श गुलाबी अत्तरतनुचे
मोद तिचाही दुनावे

कधी न मिळाले इतुके सुंदर
बसण्या आसन तिजला
गलिच्छतेच्या साम्राज्याविन
महाल गुलाबी सजला

तिथली गुंऽऽई गुंऽऽई
नको नकोशी घाणीतली का वाटे
इथे तियेचे मनही नितळसे
गुंजारवास दाटे

म्हणून थोडी दडून बसली
पाकळीत लपताना
आज तिच्या का मनास लाभे
समाधान छपताना

एक वाटले तिला परंतु
रंग गुलाबी यावा
तनास तैसा मनासही तो
अलगद लपटून जावा

माशी शिंकली असे न होवो
नासिकेस ती वदली
आता माशी पंख गुलाबी
घेऊन गगनी चढली

दि.०५/०८/२०२४
सकाळी ०९.४५ वा.



## (३२)
## एक गुलाब जो

गुलाब भिजला दवबिंदूंनी
थरारल्या पाकळ्या
रंग खुलावा इतुका सुंदर
नाजुकशा ग कळ्या

वर्षाराणी भिजवीत जाते
चिंब रानावना
बहर खेळवी ऋतू गंधाचे
भुरळ वेडी मना

जरी काट्यांवर जगणे आहे
पहा गुलाबाचे
हासत रहाणे उमलत जाणे
धुंद गुलाबाचे

हिरव्या कऱ्या पानांवरती
हिरवाई मांडली
अत्तर कुपी ही दरवळलेली
कुणी कधी सांडली

एक गुलाब जो तुझ्या नि माझ्या
काळजात राहिला
किंचित लाजून खळाळलेला
तेंव्हा मी तो पाहिला

तू मी, मी तू, गुलाब संगे
मंद्र चांदणे होते
तुझे नि माझे ह्रदय जोडले
उधाणलेले होते

दि.१०/०८/२०२४
संध्याकाळी ०५.३४ वा.



## (३३)
## जरा वळून पहावे

खळखळ अवखळ पाणी ओघळे
नाव धबधबा त्याचे
जोश होश उल्हास कोसळे
पहा तुषार तयाचे

त्या पाण्याला वेग कुठूनसा
कुठून आवेगही तो
किती उंचावर असतानाही
पडतो प्रवेगही तो

एक ताल एक सूर उमटतो
जलधारांच्या नादे
रम्य निवांतशा रानीवनी मग
गीत तयाचे गाजे

कुणी कधीतरी येते पाहण्या
रूप तयाचे अनावर
कसा घालावा मनास बांध हो
कसा ठेवावा आवर

कधीतरी होऊन धबधबा
मुक्त कोसळून जावे
पडता पडता उगमस्थाना
जरा वळून पहावे

दि.१३/०८/२०२४
रात्री ११.४८ वा.



## (३४)
## देव भेटता जन्म सार्थकी

मनास माझ्या सदाच वाटे
कुतूहल निर्मात्याचे
कुठून आणतो रंग एवढे
जगण्या कौतुक त्याचे


एक शोधण्या जन्म न पुरतो
तो तरी दशांगुळे उरतो
जरी फाटकी झोळी आपुली
सौंदर्याने भरतो

कुणी केली का अशी कल्पना
रंग छटा त्या निराळ्या
पोत निराळे स्पर्श जाणिवा
मनात उमलाव्या कळ्या

एक देह परी किती अनोखे
प्रत्येकाचे दिसणे
त्याहून कोडे आत मनातील
कसे कुणाचे असणे

उगाच वाटे हात तयाचे
एकदा स्पर्शून पहावे
देव भेटता जन्म सार्थकी
कणकण हर्षुन जावे

दि.१४/०८/२०२४
सकाळी ०७.३२ वा.



## (३५)
## मोरपीस

कधी कधी मनावर भावनेच्या
कुंचल्याचे मोरपीस फिरते ना
हळुवार मनास भावलेला श्याम
त्याच्या आठवणीत राधाही उरते ना

किती आणि कशा बरं पुसाव्यात
मनाच्या कोंदणातील स्मृतींच्या घुंगुरमाळा
त्यांना पुन्हा पुन्हा वर येत आठवांचे
डोंगर उभे करण्याचाच चाळा

नको तरी कसे म्हणावे की त्या
इतक्या हळुवार अलवार फिरतात
मनाच्या तळाशी खोल खोल कुठेतरी
कधीही न विसरण्यासाठीच उरतात

एकदा ठरवले अजिबात आठवायचे नाही
मनाला आता कधीही त्या जुन्या
साम्राज्यात पाठवायचे नाही
हळूच मनाने म्हटले, 'काय
मी आता मला भावले
तेही साठवायचे नाही?'

असे नको करुस ना म्हणत
मनाने मनानेच दडवून ठेवलेले
मोरपीस फिरवले
मी पुन्हा त्या स्मृतींच्या खेळात
सरलेल्या काळाला गिरवले

दि.१५/०८/२०२४
सकाळी ०६.५७ वा.



## (३६)
## कविता अळवासारखी

सुचली कविता अळवासारखी
हृदयाच्या पानावर
तिज सौंदर्ये काळीज खुलते
ना ये भानावर

तिज सांभाळून ठेवण्यासाठी
लगबग अंतःकरणी
ती तर कविता शब्दांमधुनी
भाव चंचल की हरणी

सरसर येते सर कवितेची
जरा विसावत हृदयी
पटकन घेते ठाव कविता
रसिकांच्या सहृदयी

खुणा तिच्या त्या दवांसारख्या
शोभवून मज जाती
नाव फुकाचे माझे करण्या
शब्दखुणा मज हाती

भाव बोलके संदेशांचे
रसिकवरांच्या गावी
शोधत रहाता माझी कविता
ती वाट वाचकां दावी

पुन्हा नव्याने रोज च येते
सर ही कविता होऊन
दवबिंदूंशी नाते जडते
शब्दांर्थांना लेऊन

दि.१६/०८/२०२४
सकाळी ०९.१९ वा.



## (३७)
## अत्तर फाया मनी राहणे

दरवळ माझा सोनचाफी रे
परिमळ असू दे राऊळी
अंगणातल्या झाडाखाली
ओसरीवरल्या जागुली

सुगंध येईल घरभर सारा
असेल मी की नसेल रे
धुंद क्षणांच्या बरसातीने
कणकण बरसून बसेल रे

पहा तिथे त्या देवळीतल्या
कोपऱ्यात मी दडलेली
आठवेल का तुला सख्या रे
प्रीत सोनेरी घडलेली

हलकी हलकी आठवणींची
झुळुक सोनेरी येताना
सुरभित होईल जीवन सारे
सोनचाफी मी होताना

बघ ना तुजला जमेल का मग
अत्तर बनवून मज ठेवणे
क्षण एकाकी क्षण गजबजले
अत्तर फाया मनी राहणे

दि.१७/०८/२०२४
रात्री ११.५४ वा.



## (३८)
## पुनव मनात विराळी

जळात पडल्या चांदोबाच्या
चांदण्याचे कौतुक
जळ ही होते चांदीसारखे
संगत शीतल आपसुक


चंचल चंचल लहरींवरती
लाट सुखाची येते
चांदण्यातल्या अलगदतेवर
हलके घेऊन जाते

ती झाडाची पहा डहाळी
कशास वाकून गेली
चांदण्यातली रात तिचीही
चांदणे माखून गेली

चंद्र कितीही करो कोंडाळे
चांदणे झिरपून जाते
खूण एक रात्रीस नभातून
हलके उतरुनी येते

तोच चंद्र अन्? तीच रागिणी
रोज कांती निराळी
मनास उधळून लावत जाते
पुनव मनात विराळी

दि.१८/०८/२०२४
सायं. ०६.१६ वा.



## (३९)
## चिंब ओल्या वाटेवरती

चिंब ओल्या वाटेवरती
मोती सांडलेले
बघ दवाचे थेंब चमचम
पल्लवीशी मांडलेले


स्पर्श ओले ओलीत्याचे
मेण वाटे मृत्तिका
गप्प होती जी उधाणली
काळजातून वृत्ती का

झाडे वेली डोलताना
थंड झुळुका वाहती
त्या गवतपात्या लाजुनी
प्रीतरंगी नाहती

डोकावून पाहे सविता
पावसाच्या अंगणी
इंद्रधनूच्या वाकलेल्या
त्या कमानी रंगणी

आज येतो गंध कोठून
मंद धुंद सारखा
त्या फुलांना त्या भुईला
होवो ना कधी पारखा

दि.२२/०८/२०२४
रात्री ११.४८ वा.



## (४०)
## **मोहनाचे वेड ते**

बघ नभातून सूर येती
आसमंती बासरी
रोज उमले गोपिकेच्या
राधिका मनी हासरी

पाहता त्या सावळ्याला
तार हृदयी छेडते
सांग ऐसे लागले का
मोहनाचे वेड ते

जाता यमुनेच्या तिरी का
तोच भेटे दामोदर
का खडा मारून जातो
घट फुटे भिजतो पदर

काज ना सुचते ग काही
तोच तो दिसतो मला
कणकणी का भास त्याचा
क्षणक्षणी भासे मला

वाटते हा जन्म सारा
पाऊली त्या वाहिला
आज मी सखये हरीला
अंतरंगी पाहिला

दि.२४/०८/२०२४
सकाळी ०७.३७ वा.



## (४१)
## कृष्णमय हो राधिका

रूप तुझे श्रीरंगा कैसे
राधेच्या हृदयातुन जैसे
अंग श्यामल सावळ्याचे
संग नीलकमल तैसे

चंद्र खुलतो रासलीले
चांदण्यातुन दंग तू
राधेच्या हृदयात वसशी
मधुर मंजु छंद तू

एकरूप नि एकजीव
मिसळुनी जातो प्रिया
एकरस होताच दंग
राधेश्याम एकचि क्रिया

वसन सारखे ताल सारखे
सूर गवसून बोलती
राधेश्यामा संगतीने
प्रीत युगुले तोलती

रंगलेल्या सांजकाळी
दंगलेल्या गोपिका
गोपही धरतात फेर नि
कृष्णमय हो राधिका

दि.२५/०८/२०२४
सकाळी ०७.२१ वा.



## (४२)
## श्रीहरी रे श्रीहरी

श्रीहरी रे श्रीहरी मी
होत जावे बासरी
अधरी श्वासांच्या लयीतून
पाहशी मज हासरी


मी सुरांच्या सोबतीने
तुज मनी नित राहते
सागरासम तू अथांग नि
प्रीतसरिता मी वाहते

भान ना उरते कधीही
बस तुझी होते प्रिया
लोचनांना झाकताना
रूप सुन्दर सत्क्रिया

अंग अंगा छेडताती
सूर वेणूचे तुझे
रोमहर्षी अंग फुलते
रंग मी लिंपू तुझे

सांग तू कैसे जगावे
जागलेल्या भावना
कोणते नाते हे आपुले
कोणत्या ऋणबंधना

दि.२७/०८/२०२४
सकाळी ०६.४३ वा.
गोपाळकाला, दहीहंडी उत्सव



## (४३)
## स्मरता कमला वा उमाकांत

जीर्ण राऊळाच्या पायरीवर
सूर्यरश्मित सकाळ तेजाळताना
वाटते घ्यावे आशीष आता
मनात गाभारा उजाळताना

घंटानाद घुमो पंचक्रोशीत
निनादती सूर भक्तीमय ते
पाऊले वळती आरती घुमते
अंतःकरण हे शक्तीमय ते

देवाचा निवास जुनाच प्रवास
दरवळ सुवास धूप दीपाचा
मंद गंध जाय दूर सुगंध
सूर सुरेल भजनी गीताचा

कळस उभा गावात शोभा
मंदिर जुने ते श्रद्धा न जुनी
देवाची भक्ती अध्यात्म शक्ती
खूण पटविली अनादी कुणी

रोज रोज येथे किरणं झुकती
चरणसेवेला कधी न मुकती
मुक्ती मिळाया झिजवून काया
येरझाऱ्या चौऱ्याऐन्शी चुकती

यावे निवांत जरा प्रशांत
मनास करता लाटाही शांत
थांबते आस मोहाचा भास
स्मरता कमला वा उमाकांत

दि.२८/०८/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



## (४४)
## भरलेल्या मेघांची तोरणे

असा पाऊस मोहरून यावा
आयुष्याचा उत्सव व्हावा
थेंब कळ्या सुखाच्या बरसता
दाह पोळता विझून जावा

त्याची वाट किती मी पहावी
जीव कलिका सुकू न द्यावी
आस चातकी उरात राखत
सर अंगावरी ती झेलावी

स्पर्श शीतल गारवे धुंद
स्वप्नं उमलू पाहते मंद
मज हरीचा जडतो छंद
तीरी यमुनेच्या कृष्णगंध

आता जावे कुठे नि कशाला
वर्षा प्रीतीची हृदयी बंद
सारे करता समर्पणाला
अंतःकरणी आनंद कंद

अस्सा पाऊस दवाचा दूत
थेंब मोतीयाचे ओंजळीत
जरा थांबला दडून वेडा
हास हासत कवळ्या कळीत

फुले पावसाची वेचताना
मन ओलावून परिमळे
आठवांच्या नदीला भरते
वर शांत मनी खळखळे

एक पाऊस आत राहतो
कधी कोसळतो कधी नाही
भरलेल्या मेघांची तोरणे
थेंबपाऊस दाराशी काही

दि.२९/०८/२०२४
सकाळी ०७.४९ वा.



## (४५)
## गुणपती गणपती

गुणपती गणपती
कलापती अधिपती
द्यावी आम्हा देवा सदा
सद्बुद्धीची हो संपत्ती

आगमनाने फळाव्या
कामना ह्या साऱ्या साऱ्या
सेवा तुझी घडो देवा
चुको चोऱ्याऐन्शी फेऱ्या

प्रसादाची अन्? पूजेची
लगबग घरीदारी
आरतीचे सूर येती
मंगलाची तुझी स्वारी

व्हावे विराजित बाप्पा
हृदयाचे सिंहासन
अंतरात्म्याचा केवडा
भाव जास्वंदी आसन

मोदकाच्या नैवेद्याला
स्वीकारावे मोदे मोदे
विघ्न माझे दूर करा
जीवन भरो आमोदे

दि.०९/०९/२०२४
सकाळी ०७.४८ वा.



## (४६)
## महालक्ष्मी माऊली

झाला सोहळा आजचा
तुझ्या महानैवेद्याचा
काय काय देऊ तुला
जाण भाव लेकराचा

सोळा चटण्या खमंग
सोळा भाज्याही सजल्या
वडे वड्या भजे आणि
पापड कुर्वड्या वाढल्या

कढी आमटी सुवास
साखरभात मूद आली
वरणभातावर तूप
पुरणाची घाई झाली

गरमागरम पोळीशी
साजूक तुपाची घे वाटी
खीर भरडा फराळ
संगे व्यंजनांची दाटी

आता दाविते नैवेद्य
पंचप्राण आरतीला
किती नमवू मी माथा
भारतीय भारतीला

पंचारती होत आली
झाले हातवे देऊन
मंत्रपुष्पांजली म्हणू
भाव सारे एकवटून

सुवासिन ब्राह्मणांचे
तुझ्या पुढ्यात भोजन
स्नेही आप्त घेती घास
तृप्त होऊनिया जन

देते तांबूल तुला ग
मुखशुद्धी साठी माय
तुझ्या कृपेचा विडा हा
रंगू दे जीवनी काय

आता दृष्ट काढिते मी
तुझ्या राजस रूपाची
खलले काजळ माते
काजळी दिवा तुपाची

निज निज आज जरा
उद्या कहाणी सोहळा
तुझे तातू हाती बांधू
भवताली नाती मेळा

तुझी आरास पाहून
मन भरूनी पावते
सत्त्व रूप देखणे की
तुझ्या चरणी राहते

महालक्ष्मी माऊली
मी तुझ्या चरणी राहते
गौराई गौराई माय
मी तुझ्या चरणी राहते

दि.१२/०९/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



## (४७)
## एक मन हरवून जाता

आज कोठे थांबले हे
मन मला कळलेच नाही
का असे घडले की त्याने
थोडेही छळलेच नाही


शांत होते बैसले ते
हृदय कोपऱ्यातून कसे
शहाणे झाले मूल वागे
तेही अगदी मग तसे

हट्ट नाही कोणतेही
कोणत्या ना मागण्या
दुःख झाले म्हणून नाही
देत बसले डागण्या

शब्दही ना बोलले ते
मौन होते सारखे
मनच झाले आज माझ्या
का मनासी पारखे

वाटले माझे मला हे
नाही वागणे चांगले
एक मन हरवून जाता
जीवनच मज पांगले

दि.२६/०९/२०२४
सकाळी ०८.३३ वा.



## (४८)
## भाळणे भाव पाळणे

आता तुला सांगायचे ते
सांगणे होईल का
शब्दही ना बोलता मी
मन कळून येईल का

तू न दिसशी तर मनाशी
घेरते माझ्या उदासी
अंतरातून सूर निघती
पाहते तर तूच गाशी

तू जरी काहीच मजला
सांगशील नाही कधी
ओळखून घेईन तुझिया
घालमेलीला आधी

बोलतील नयनातल्या त्या
भावना माझ्या तुला
घे जरा समजून नाजूक
सुमन मन माझ्या फुला

भाळणे भाव पाळणे
सांभाळणे एकदूसऱ्या
साथ ऐशी देऊ सखया
जखमा भरतील दूखऱ्या

दि.२७/०९/२०२४
सकाळी ०८.२८ वा.



## (४९)
## ना बोचतील काटे

आवाज दे प्रिया तू
देईन हाक तुजला
जुळतील सूर आपुले
अनुराग भाव सजला

घुमतील नाद सोबत
अवकाश पोकळीत
चैतन्य उसळू येईल
सुमना मना कळीत

आरोह चढते चढतील
अवरोह साथ सोबत
आलाप गायनाचे
आयुष्य जाय सोबत

झाली दिशा नवी ही
क्षितिजास जाग आली
जो अस्त मानलेला
उदयास भाग्य घाली

सारे नवेच वाटे
ना बोचतील काटे
माझ्या मनात आशा
उमलून आज दाटे

दि.२९/०९/२०२४
सकाळी १०.२१ वा.



## (५०)
## तू जपून टाक पाऊल सजनी

तू जपून टाक पाऊल सजनी
वाट घसरडी आहे
हात हाती दे प्रिये प्रियतमे
भूमी निसरडी आहे

कुठून वाहतील पाट जलाचे
चिक्कन माती चिक चिक
हिरव्या हिरव्या गवतपातुल्या
खलले काजळ छिक छिक

तुझ्या लाजऱ्या मुखड्यावरती
रान पुरे भाळले
लता वेलींनी कुसुम फुले तुज
वेणीतून माळले

ये ये राणी आतुर वाणी
माझी झालेली
आज अंगणी सखी लाडकी
माझी आलेली

कसे पाहू मी सृष्टी इथली
सौंदर्या नटलेली
तुझ्या कराला स्पर्श होतसे
गात्रे ही गोठलेली

शहारलेली काया माझी
प्रीत तुझी भरलेली
मनात नाही काही अजुनी
तूच तू सखी उरलेली

दि.१५/१०/२०२४
रात्री ०९.१४ वा.



## (५१)
## दिवाळीच्या आठवणी

आला सण दिवाळीचा
उत्सव हा प्रकाशाचा
घरोघरी दीप लावू
महोत्सव हा तेजाचा

दारी सडा नि रांगोळी
अभ्यंगाच्या हो अंघोळी
फराळाची रेलचेल
जोडी पुरणाची पोळी

नव्या वस्त्रांचा सुवास
उटण्याचा धुंद वास
पूजा देवांची आरास
स्मृती दिवाळीच्या खास

चिल्लुया पिल्लुयांची धमाल
फटाक्यांची ती कमाल
रंग नभातून लाल
रोषणाई बेमिसाल

भेटीगाठी प्रेमभऱ्या
मीलनाच्या ओढी खऱ्या
लाडू करंज्या साटोऱ्या
दीपावलीच्या पेटोऱ्या

अशी येते दीपावली
दिव्या दिव्यांची अवली
लक्ष्मी कांचन पावली
पाडवा भाऊबीज भली

दिवाळीच्या आठवणी
मना कुठे पाठवणी
काळजात साठवणी
डोळ्यातून दाटवणी

एक दिवा तेवतो जो
काळजात राहतो जो
झरा माया वाहतो जो
वाट माझी पाहतो तो

दि.२३/१०/२०२४
रात्री ११.४३ वा.



## (५२)
## तू प्रिये जगणे नवे

कल्पनेतील तूच माझी
देखणी मनमोहिनी
देखता मज तृप्तता ती
तूच कमनीय कामिनी

केशसंभारात गजरा
माळलेला तू जसा
काळजाच्या पाकळ्यांचा
गोफ गुंफतो गे तसा

बोलके डोळ्यातले तव
भाव मोहून टाकती
तुज मुखाच्या कांतीवरती
तेज किरणे फाकती

ओष्ठ कलिका हासताना
झेलती सुंदर फुला
मन उगा माझे पुन्हा का
स्वप्नं पाहून घे झुला

नासिकेच्या चाफेकळीवर
चांदणीची चांदणी
अन झुब्यांच्या हेलकावी
झुंबराची टांगणी

मान वेळावून ऐसे
पाहते का तू मला
जीव ओवाळून टाकीन
प्रियतमे तुजवर भला

त्या फुलांच्या ताटव्याला
स्पर्श कोमल तुजसवे
तूच माझी भाग्यरेखा
तू प्रिये जगणे नवे

दि.२४/१०/२०२४
सकाळी ०९.४७ वा.



**(५३)**

**दे सख्या मज प्रीत भावन**

दाटल्या या भावना
आभाळागत भरलेल्या
आठवांचे मेघ आणिक
दामिनी त्या ठरलेल्या

कोणत्या रे वादळांनी
हेलकावे खायचे
कोठुनी कोठेही मग रे
मनमेघांनी जायचे

डोंगरांची रांग जर का
अडविण्याला थांबली
गर्दी होते भावनांची
आत उडते धांदली

बरसुनी जातात डोळे
भीज ओली वाहते
का तुझी इतुकी प्रिया रे
वाट वेडी मी पाहते

एक वर्षा वर्षता ही
आस ना होते कमी
दे सख्या मज प्रीत भावन
जगण्याची बघ ती हमी

दि.०४/११/२०२४
रात्री ११.५५ वा.



## (५४)
## भाग्यवती मज हातीची

ऐक राणी ऐक माझे
प्रीतभरले सांगणे
तू सदा माझीच म्हणता
गाली हसले चांदणे

सारुनी विरहास दूरी
मीलनाच्या वाटुल्या
काळजाच्या वाटेवरती
गोड मधुरा भेटुल्या

सांधताना रेशमाचे
मल्मली धागे जरा
मोहवी मज भाळवीतो
मोहिनी तव चेहरा

भास नि आभास सारे
आसमंती दंगले
तेवढ्यातच स्वप्न आपुले
सप्तरंगी रंगले

मागतो मी रोज त्याला
साथ राहो साथीची
ही सखी ही प्रीत वेडी
भाग्यवती मज हातीची

दि.०५/११/२०२४
सकाळी ०४.३५ वा.



## (५५)
## छंद कमळ जडू दे न जीवा

किती टवटवीत कमळफुलें ही
जळात उमलून आली
पंक कितीही लिपटून पायी
उषा नवी तरी झाली

दले पसरली देठाभोवती
विसावुनी जणू झुकलेली
दुःख बुडाशी तरी कमळे ही
दुःख भावना मुकलेली

उगाच नाही आसन होऊन
लक्ष्मीचे खुललेले
अनुरक्तीने नयनकमल हे
प्रियतमास भुललेले

मुखकमळाची शोभा सांगते
हृदयकमल किती गोड
आत्मकमळ उमलून येई तो
नसे कशाची तोड

प्रसन्न कांती कमळफुलांची
हसणारी कुमुदिनी
मृणालिनी दलिनी कमलिनी
सुरेख हो प्रमोदिनी

असे उमलू दे पुन्हा खुलू दे
मना भुलू दे राजीवा
इंदीवर अरविंद पंकजा
छंद कमळ जडू दे न जीवा

दि.०७/११/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (५६)
## आजही जेंव्हा पाहतो सुरंगी

मन का अडकून पडते
सुरंगीत हे माझे
तो काळ सुगंधित सुंदर
आजही हृदयी साजे

उंच कुठे त्या विशाल तरुवर
इवली इवली सुमने
गोड मधुरशा सुवासात जी
धुंद आपुली मने

रंग कांचनी पिवळा पिवळा
स्पर्श मुलायम होई
आजही माझे काळीज सखये
गजऱ्यात सुरंगी होई

किती रमलेला काळ तो होता
मी तू प्रीत भरलेले
तिथेच कोण्या कवीस होते
गीत अमर स्फुरलेले

आजही जेंव्हा पाहतो सुरंगी
आठव होते ताजी
कशी होतसे सखे तू माझी
अनूनयाला राजी

दि.०६/११/२०२४
रात्री ११.५८ वा.



## (५७)
## वाटे मला कितीदा

माझ्या मनात तेंव्हा काहीच भाव नव्हते
वसले अजून वेडे प्रेमाचे गाव नव्हते

तुज वाटले तसे ते नव्हते उगा इशारे
वाहत्या नदीचेही ग बघ कोरडे किनारे

येण्यास काळजात नव्हती जरीही बंदी
माणूस बुजरा होतो नव्हतो कधीच छंदी

उडत्या बटांमध्ये तो घालून वारा पिंगा
जेंव्हा करून जाई समवेत तुझ्या दंगा

वाटे मला कितीदा सांगू कशी मी प्रीत
वाटे पटेल का ग तुजला ती माझी रीत

मांडे मनी मनीचे राहून तेव्हा गेले
दिसता किती दिसांनी तू जागे मजसी केले

दि.०८/११/२०२४
सकाळी ०६.४९ वा.



## (५८)
## गाव तोच रेखावा

आठवणींच्या हिंदोळ्यावर
झुलते मन माझे
कुठे राहते कुणास तगाउक
ना सोबत तनमन माझे

तिथल्या डॉगर दऱ्या दुशालीत
हिरवाईच्या दंग
एक मनाला चढत जातसे
उत्साहाचा रंग

वाट मोकळी जराजराशी
ओली ती हो चिंब
माणसातल्या माणुसकीतून
निखळ मनाचे बिंब

सान झोपड्या अथवा राहोट्या
कुट्या काड्याकुड्यांच्या
आनंदातून डोलत जातील
तृषा कधी न माड्यांच्या

परतून आले शरीर तिथुनी
काळीज परतत नाही
थोडेही त्या सृष्टीमधुनी
वेडे सरकत नाही

जणु राहतो खोल तळाशी
हृदयाच्या देखावा
जरी एकटी मनात माझ्या
गाव तोच रेखावा

दि.१०/११/२०२४
सकाळी १०.०४ वा.



## (५९)
## काट्यातल्या गुलाबा रे

गुलाबाच्या फुला
कसे सांगू राजा तुला
सखी मनामध्ये घर
करू दे न मला

तुझ्या मदतीने तिचे
जिंकावे हृदय
नव्या नव्या प्रीतीचा रे
व्हावा की उदय

राग रुसवे की प्रेम
तुझ्या सोबतीने
वाढू दे रे ओढ आमची
वाऱ्याच्या गतीने

तुझा रंग तुझा गंध
तुझा छंद गोड
दोघांमध्ये तुझ्यामुळे
बंध तो अजोड

काट्यातल्या गुलाबा रे
दुःख तुझ्या तळी
तरी सुखा वाटतोस
फूल की कळी
असशी फूल की कळी

दि.११/११/२०२४
सकाळी ०९.४२ वा.



## (६०)
## ऐक बा विठ्ठला

ऐक बा विठ्ठला
जीव कासावीस झाला
डोळे वाटेला लावून
माथा तुझ्या चरणाला

पाप पुण्य ना माहीत
मला तुझा एक ठाव
देवा समजून घे रे
माझा भोळा भक्तीभाव

चंद्रभागेच्या जळाशी
जशी शीतलता राहें
माझ्या मनात तुझ्याच
आधाराची नदी वाहे

बाप जगताचा तूच
माय रखुमाई संग
तुझ्या गाभाऱ्यात जीव
मन गजरात दंग

आज संपली ती नीज
तुला जाग आता आली
देवा तुझी माझी भेट
उपवासी गोड झाली

दि.१२/११/२०२४
रात्री १०.०५ वा.



## (६१)
## हातातल्या गुलाबाने

हातातल्या गुलाबाने
मोगऱ्याला खुणावले
गंधाने धुंद वारे
परिमळ दुणावले

तिच्या केशकलापात
गजऱ्याची वीण
गुलाबाची खोवण
ती रूपगर्विण

कपोलांचे स्पर्श तिच्या
जणू पाकळ्या
उमलून सहवासी
तिच्या येती कळ्या

गाणे कुणीतरी गाते
धुंद धुंद सूर
तिच्या ओढीलागी
माझ्या हृदयाला पूर

रंग तिचा गोरा गोरा
अंग चंदनाचे
गुलाबाचे स्पर्श तिचे
गीत स्पंदनांचे

सांगा तिला कुणीतरी
झुरतो मी इथे
देह मजजवळी परी
मन तिच्या तिथे

दि.१३/११/२०२४
रात्री ११.३४ वा.



## (६२)
## लावण्ये घडविले

पावसाळ्यातील सरी सराव्या
ओल्या रस्त्यातून
पसरून जावे धुके धुकेसे
काय दिसे त्यातून

गर्द केशरी पानांवरती
थेंब घसरती जेव्हा
पाने ओघळून येती खाली
अलगद ओली तेव्हा

दुरदूरवर कुणीच नाही
कुणीच सोबत येथे
तरी मनाने पुन्हा पुन्हा का
रमण्या जावे तेथे

ओल्या थांबांच्या ओळीतूम
पाऊस लिहितो गाणी
आपण पाहतो झरझर आले
मेघातून हे पाणी

सूर तयाचे मल्हारी ते
ताना टपटपताना
उंच कधी तर कधी खालचे
अवरोह आरोह घ्या ना

काळ्या काळ्या सडकेवरती
दर्पण कुणी ठेविले
पहा स्वतःच्या प्रतिबिंबाला
लावण्ये घडविले
तयाने लावण्ये घडविले

दि.१४/११/२०२४
सकाळी ०९.१२ वा.



## (६३)
## झाडा तुझ्या फांदीवर

झुलणाऱ्या झुल्या तुला
कसे सांगू गूज
वाऱ्या सवे चाले माझे
हळू अलगूज

किती माझ्या मनातले
ताण घालविशी
क्षणामध्ये चेहऱ्यावर
हासू तू आणीशी

उंच उंच नभातून
फिरवून आण
हवेवरी घोळ नाही
आशा माझ्या जाण

खुसखूस खसखस
पिकलीय छान
सख्या साऱ्या मिळुनीया
उठवू या रान

झाडा तुझ्या फांदीवर
जीव टांगलेला
माहेराच्या आठवांनी
भाव रंगलेला
भाव रंगलेला

दि.१९/११/२०२४
रात्री ०७.१५ वा.



## (६४)
## जगणे असेच चाले

सागर सुंदर नभ हे मनोहर
रम्य तरुवर राजी
मोहित करती शांत सावल्या
निळीशार रंगराजी

शुभ्र वालुका मेघही ढवळे
एकमेकी मिसळले
गडद निळे अन फिके आकाशी
हिरवे रंग हे सगळे

दूर चालती नौका काही
आपुल्या धुंदीत
कुठे त्या ठाऊक आहेत वेड्या
जीवन बंदीत

जोवर येतील हलक्या झुळुका
तोवर प्रवास सुखकर
जशी वादळे देती तडाखे
मन हो वेडे दुखकर

जगून घ्यावे आयुष्याचे
क्षण सुंदर जे आले
येऱ्या झाऱ्या चालू द्याव्या
जगणे असेच चाले

दि.२२/११/२०२४
रात्री १०.४५ वा.



## (६५)
## इवली चिमणी राहते मनी

चिव चिव चिमण्या गोजिरवाण्या
रूप कस देखणं
जीव इवलुसा झेप आकाशी
अंगण खुश राखणं


दाण्यासाठी घरी दारी ग
गोड चिवचिवाट
पाण्यासाठी नकोच वणवण
वाहतील पाट

बाळगोपाळा संगे तुमचे
किती चालती खेळ
घरट्यामध्ये पिल्लं घालतील
लाडा कोडाचा मेळ

काडी काडी कापूस माडी
शेज मऊशार छान
घरटे सुंदर पाहून हरवे
इथे कुणाचेही भान

इवली चिमणी राहते मनी
बालपणीची साथ
पुन्हा तुला ग बागडण्याला
देईन माणूस हात

दि.२९/११/२०२४
रात्री ११.५४ वा.



## (६६)
## अशी पहावी जरा बकुळी

कुठून आणली नाजूक बकुळी
हार मधुर गोवला
सान कुडी इवली इवली
स्पर्श तिचा कोवळा

श्रीकृष्णाच्या गळ्यात पडली
रंग सावळी बकुळी
पारिजातका सोडून घेतो
श्याम सुंदर बकुळी

गंधाचे हो काय पुसावे
मंद सुगंध दरवळ
फुलली अथवा सुकली तरोही
भुलवून जातो परिमळ

कुठून निर्मितो इतुकी सुमने
हळवी हळवी रसिकवर मने
लाजून रहाते दूर दूरशी
वेडी बकुळी मना लपवणे

अशी पहावी जरा बकुळी
स्मरता स्मरता तिची ती खळी
प्रिया तर माझी इतुकी नाजूक
तनु वेलीवर वदन सदन कळी

दि.०३/१२/२०२४
रात्री ११.१८ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**
  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)
  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५
  ई-मेल : dr.manjushak@gmail.com
  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा, सुख सुखाचं, पानापानातली कथा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश, निरव नमन (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी, फुललेलं मौन (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता, शब्द तुझ्या नावाचे (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी, मृणालिनी, उडण्या हे आभाळ (स्त्रीजीवन), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, क्षणांचं देण, आयुष्याचं गाव (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, दरवळ तुझे नि माझे (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती-आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी, लोभसवाणी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी, अबोली, अनावर मना, मल्मली, अक्षरा, अनुरंग, नवी नवेली, मन ओथंबुन गेले, उमलवाट, (मिश्र कविता) मन मनुल्या, शब्द पाखरं (मन), सुखाचा किनारा (सुख-दुःख), आनंद गंधपाणी, दूर त्या तिथे (गंध-सुगंध) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(मन) – वेध मनाचा, मन मोहरून माझे, (पशु–पक्षी – घरटे) स्पंदनरेषा, (नाती–गोती) – थांब जरा तू, (चंद्र आणि लज्जा या भावनांवरील कविता) – घडते नवेच काही. (संस्कृत बाल काव्यसंग्रह) – बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – त्रिसहस्रसीवनम्, (संस्कृत अनुवाद) – मनुष्यः.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१

- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान ‘प्रकाशवाटा’ या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी ‘प्रकाशमार्गा:’ | https://www.loksatta.com//lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/?utm_source=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653335052919 8id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid= 4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम - ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम - ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग - १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग -२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : १२४
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ०८
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●